लोकमत

# मराठी विभागप्रमुखपदी नंदकुमार मोरे यांची निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील



मराठी अधिविभाग-प्रमुखपदी डॉ. नंदकुमार विष्णू मोरे यांची नियुक्ती झाली आहे. त्यांनी सोमवारी पदभार स्वीकारला. विभागाचे माजी प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

मराठी विभागात प्राध्यापक असणाऱ्या डॉ. मोरे यांची रोटेशननुसार विभागप्रमुखपदी नियुक्ती झाली. गेल्या १८ वर्षांपासून डॉ. मोरे अध्यापन क्षेत्रात कार्यरत आहेत. भाषाविज्ञान, बोलीअभ्यास, आधुनिक मराठी साहित्य त्यांच्या अभ्यासाचे विषय आहेत.

# सोलापूरच्या विद्यापीठाने घेतलेली भरारी गौरवास्पद

लोकसत्ता प्रतिनिधी

**सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने अठरा वर्षांच्या कमी कालावधीमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विविध अभ्यासक्रमांची केलेली निर्मिती व बदल, प्रशासकीय नवीन इमारत व परीक्षा भवनाचे बांधकाम, जागतिक दर्जाचे क्रीडांगण व इनडोअर स्टेडियम, दीडशेहून अधिक किमान कौशल्यावर आधारलेले अभ्यासक्रम, तसेच यंदाच्या वर्षी धाडसाने सुरू करण्यात येणारे कॉन्स्टिट्यूट कॉलेज म्हणजे उच्च शिक्षण क्षेत्रात मोठी भरारी आहे. अनेक आव्हाने असतानाही या विद्यापीठाने खूप मोठी प्रगती साधल्याचे गौरवोद्गार कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी शिर्के यांनी काढले.

सोमवारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा १८ वा वर्धापन दिन समारंभ थाटात साजरा झाला. त्या वेळी आयोजित मुख्य समारंभात डॉ. शिर्के बोलत होते. याच समारंभात उद्योजक किशोर चंडक यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. रोख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह, गौरवपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. चंडक यांनी स्वतःचे एक लाख रुपये घालून पुरस्काराची रक्कम विद्यापीठाला परत केली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, की उच्च शिक्षणात गतीने बदल होत आहेत. त्यानुसार सर्वच शैक्षणिक संस्था आणि विद्यापीठांसमोर मोठी आव्हाने येत आहेत. ही आव्हाने पेलण्यासाठी आपणांस सज्ज व्हावे लागणार आहे. विद्यार्थ्यांसाठी विविध योजना आखाव्या लागणार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची प्रगती आज राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत पोचल्याचा दावा केला. परिघाबाहेर जाऊन विद्यापीठाने शिक्षणाची पद्धत अवलंबली. ती राष्ट्रीय शिक्षण धोरणात अधोरेखित आहे. संशोधनाला बळ देण्यासाठी देखील विद्यापीठांनी नेहमीच पुढाकार घेतला आहे. संशोधन हाच विद्यापीठाचा मुख्य आत्मा असला पाहिजे, हे आमचे धोरण असल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले. प्र-कुलगुरू डॉ. विकास पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. ममता बोल्ली व प्रा. तेजस्विनी कांबळे यांनी केले, तर आभार डॉ. प्रकाश व्हनकडे यांनी मानले.

## यांचाही पुरस्काराने सन्मान

१) उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार- एस. के. एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोर्टी, ता. पंढरपूर
२) उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार- प्राचार्य डॉ. शंकरराव पाटील, बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी, ३) उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार- डॉ. माया पाटील, सामाजिकशास्त्रे संकुल, विद्यापीठ कॅम्पस, ४) उत्कृष्ट शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार - गिरीश कुलकर्णी, विद्यापीठ अभियंता, ५) राजश्री शाहू महाराज गुणवंत विद्यार्थी पुरस्कार- सोमनाथ धुळे, वसुंधरा महाविद्यालय, ६) डॉ. बी. वाय. यादव शिष्यवृत्ती-दिव्या बनकर, शिवाजी महाविद्यालय, बार्शी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

02 AUG 2022 पुढारी

# विद्यापीठ ऑफलाईन परीक्षेला ४१ हजार विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्रांतर्गत विद्यापीठ स्तरावरील परीक्षेंतर्गत सोमवारी ६० विषयांच्या परीक्षा झाल्या. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे ४१ हजार ६१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

विद्यापीठ परीक्षा विभागाच्यावतीने १९ जुलैपासून महाविद्यालय, विद्यापीठ स्तरावरील ५६१ परीक्षा सुरू झाल्या आहेत. बी.ए. बी.एस्सी. (आयटी, कॉम्प्युटर सायन्स, शुगर टेक), बी.एस्सी. (आयटी, इन्व्हायर्मेंट सायन्स, कॉम्प्युटर सायन्स), बीआयडी, एम.फार्म., एलएलबी, एलएलएम, बीसीए, एमसीए, बी.व्होक, बी.ए., एम.ए., एमबीए, बी.ई., बी.टेक., बी.फार्म. आदी विषयांच्या परीक्षा झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.ए.एन.जाधव यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठ मराठी विभाग प्रमुखपदी डॉ. नंदकुमार मोरे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभाग



प्रमुखपदी प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांची निवड करण्यात आली.

मराठी अधिविभागाची यापूर्वी डॉ. रणधीर शिंदे यांच्याकडे जबाबदारी होती. डॉ. मोरे यांची सोमवारी निवड करण्यात आली. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते त्यांना निवडीचे पत्र देण्यात आले. डॉ. मोरे यांना १८ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव आहे. समाजभाषा विज्ञान आणि मराठी कादंबरी, भाषासंवाद हे ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. राज्य सरकारचा २०११-१२ चा उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा 'नरहर कुरुंदकर' पुरस्कार त्यांना मिळाला आहे. चंदगडी बोली : इतिहास व भूगोल, कोल्हापूर जिल्ह्यातील पारंपरिक व्यवसाय या विषयावर संशोधनपर लेखन केले आहे. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळावर दहावी मराठी कुमार भारतीसाठी संपादक मंडळ सदस्य म्हणून काम पाहिले आहे.

पुढारी




कोल्हापूर : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. आर. के. कामत, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. नंदकुमार मोरे आदी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठात अण्णा भाऊ साठे, बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांची जयंती साजरी

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे व बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रामध्ये बॅ. खर्डेकर यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. आर. के. कामत, अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, विलास सोयम, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. आर. व्ही. गुरव आदी उपस्थित होते.

पुढारी



कोल्हापूर : पी.जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझमच्या विद्यार्थ्यांकडून पत्रकारितेशी संबंधित विविध ग्रंथ अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

# ऑनलाईन पत्रकारिता विद्यार्थ्यांचा शिवाजी विद्यापीठात स्नेहमेळावा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ.ग.गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने सुरू असलेल्या पी.जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात झाला.

विद्यार्थ्यांनी यावेळी पत्रकारितेशी संबंधित विविध ग्रंथ अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांच्याकडे सुपूर्द केले.

वर्षभरात विद्यार्थ्यांसाठी फोटोग्राफी कार्यशाळा, अँकरिंग कार्यशाळा, डिजिटल मीडियावरची विविध व्याख्याने, यासह विविध उपक्रम राबवण्यात आले होते. अभ्यासक्रमाच्या वर्ष समाप्तीनिमित्त विद्यार्थ्यांनी निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित केला होता. सुरुवातीला पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. स्वागत व प्रास्ताविक मतीन शेख यांनी केले. डॉ. शिवाजी जाधव, सुमित कदम, अक्षय दळवी, सुशांत उपाध्ये आदींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रम सादर केले. राजेश कदम यांनी आभार मानले.

02 AUG 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अण्णा भाऊ साठे, लोकमान्य टिळकांना अभिवादन

कोल्हापूर, ता. १ : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती आणि लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध शाळा, महाविद्यालये, सार्वजनिक संस्था, संघटनांतर्फे अभिवादन करण्यात आले. शहरासह जिल्ह्यात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.




कोल्हापूर : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात प्रतिमेस अभिवादनप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासमवेत अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. नंदकुमार मोरे, विलास सोयम. दुसऱ्या छायाचित्रात बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासमवेत अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. डी. बी. सुतार, डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. एस. व्ही. थोरात, डॉ. खामकर, श्री. मातेकर आदी.

### शिवाजी विद्यापीठ

कोल्हापूर : लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांची जयंती आज शिवाजी विद्यापीठात साजरी झाली. आज शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रामध्येही प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते बॅ. खर्डेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. रणधीर शिंदे, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. डी. बी. सुतार, उपग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर, सहाय्यक ग्रंथपाल डॉ. एस. व्ही. थोरात यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
0 2 AUG 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठी विभागप्रमुखपदी डॉ. नंदकुमार मोरे

## शिक्षण क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव : ५० पेक्षा जास्त शोधनिबंध प्रसिद्ध

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांचा तीन वर्षांचा कार्यकाल संपला आहे. त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर डॉ. नंदकुमार मोरे यांची निवड झाली आहे. सोमवारी डॉ. शिंदे यांच्याकडून डॉ. मोरे यांनी कार्यभार स्वीकारला. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

डॉ. मोरे यांचे मूळ गाव चंदगड तालुक्यातील हलकर्णी असून सध्या कोल्हापुरातील इंगळेनगर येथे राहतात. त्यांनी २८ वर्षे प्राध्यापक आणि प्रभारी प्राचार्य म्हणून काम केले आहे. त्यांनी मराठी विषयातून एम. ए., पीएच. डी. केली



**कोल्हापूर : डॉ. रणधीर शिंदे यांच्याकडून कार्यभार स्वीकारताना डॉ. नंदकुमार मोरे.**

आहे. ते नेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. त्यांनी 'मराठी कादंबरीची समाजभाषा वैज्ञानिक चिकित्सा' या विषयावर पीएच. डी. केली असून, भाषाविज्ञान, बोलीअभ्यास, आधुनिक मराठी साहित्य हे त्यांच्या अभ्यासाचे विषय आहेत. त्यांना आतापर्यंत विष्णू नारायण कुलकर्णी भाषाभूषण पारितोषिक, माधव जूलियन पारितोषिक, उमा गिरीष पारितोषिक, प्रा. रामचंद्र कृष्णाजी पानसे पारितोषिक, जयश्री गुरूराज हनसे पारितोषिक आदी पारितोषिके प्राप्त झाली आहेत. त्यांची आतापर्यंत तीन पुस्तके प्रकाशित झाली आहेत. तर राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर ५० पेक्षा जास्त शोधनिबंध प्रसिध्द झाले आहेत. चंदगडी बोली, जिल्ह्यातील पारंपरिक व्यावसायिक, बलुतेदारांच्या संस्कृतीच्या, लोकसाहित्याचा आणि बोलीभाषांचा अभ्यास, चंदगडी बोलीचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास यासह अन्य विषयावर संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत.